अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ६० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## आळंदीत माऊलींचा रथोत्सव सोहळा

**पिंपरी** : वीणा, टाळ आणि मृदंगाच्या निनादासह माउली, माउली, श्री विठ्ठल, श्री विठ्ठल, ज्ञानोबा माउली, तुकारामांच्या जयघोषात वारकऱ्यांच्या उपस्थितीत कार्तिक वद्य द्वादशीनिमित्त माउलींचा रथोत्सव साजरा झाला. नरसिंह सरस्वती यांनी बनविलेल्या १५० वर्षे जुन्या सिसम लाकडी रथातून रथोत्सव सोहळा झाला. भाविक भक्तिमय वातावरणात चिंब झाले. माउलींचा ७२८ वा संजीवन समाधी दिन सोहळा गुरुवारी संपन्न होणार आहे. तर, रविवारी सोहळ्याची सांगता होणार आहे. बुधवारी पहाटे खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते द्वादशीची शासकीय महापूजा झाली.




## एकनाथरावांनी केलं मन मोकळं

# मुख्यमंत्रीपदाचं कसं, मोदी-शहा सांगतील तसं!

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील गेल्या चार दिवसांपासून वाढत चाललेला मुख्यमंत्रीपदाचा तिढा आता सुटण्याचा मार्गावर आहे. माळवते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचावरचा दावा सोडून दिला आहे. महायुतीच्या सत्तेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपश्रेष्ठी अमित शाह हे जे निर्णय घेतील तो मला होईल, असा स्पष्ट निर्वाळा बुधवारी दिल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा या पदावरचा मार्ग मोकळा झाला आहे. महायुतीमधील तीनही पक्षांच्या नेत्यांची आणि भाजप श्रेष्ठींची गुरूवारी नवी दिल्लीत बैठक होणार असून त्यात नव्या सरकारचा फैसला होणार आहे.**



- ▸▸ मघार घेतल्याने देवेंद्रभाऊंचा मार्ग मोकळा
- ▸▸ महायुतीवरील पहिले संकट टळले
- ▸▸ आज दिल्लीत होणार फैसला

### आज दिल्लीत बैठक...

नव्या सरकारबाबत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्यासमवेत भाजपश्रेष्ठींसमवेत गुरूवारी दिल्लीत बैठक होणार आहे.त्यात मुख्यमंत्रीपदाची घोषणा होईल तसेच नव्या सरकारची दिशा ठरवली जाणार आहे. ही माहिती शिंदे यांनी या पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याविषयी मराठी जनतेत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती.तीन दिवस झाले तरी राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा केला गेला नाही.त्यामुळे राज्यात संभ्रमाचे वातावरण निमार्ण झाले होते.महायुतीत या पदावरून धुसपूस सुरू असल्याची शंका व्यक्त होवू लागली होती. शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदावर दावा केल्यानंतर महायुतीत वाद असल्याचे समोर आले होते.वर्षा या आपल्या बंगल्यात कुणी येवू नये,असे आदेश देवून शिंदे यांनी कुणाशीही न बोलण्याचे पथ्य पाळले होते.मुख्यमंत्रीपदासाठी दोन दिवसात दिल्लीत बैठका झाल्या.तरीही निर्णय झाला नव्हता. भाजप मुख्यमंत्रीपद पक्षाकडेच ठेवणार असल्याचे बोलले जात होते.

दरम्यान, गुरूवारी ठाण्यातील आपल्या निवासस्थानी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत भाष्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह हे मुख्यमंत्रीपदाबाबत जो निर्णय घेतील, तो निर्णय आपल्याला मान्य असल्याचे शिंदे यांनी जाहीर केले.त्यामुळे महायुतीतील चिंतेचे वातावरण सरकन निघून गेले. मी कार्यकर्ता म्हणून काम केले. मी कालही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो. आजही करत आहे. मी मुख्यमंत्री समजलो नाही. कॉमन मॅन म्हणून काम केले. महाराष्ट्रातील तमाम मतदार आणि जनतेला धन्यवाद देतो आणि पुन्हा त्यांचे आभार मानतो. याचे कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात विजय मिळाला, ही लँडस्लाईड व्हिक्ट्री आहे. गेल्या अनेक वर्षात असा विजय मिळाला नाही, असंही शिंदे म्हणाले.

### ''नापी है मुठ्ठी भर जमीन, अभी सारा आसमान बाकी है''

भाजपाचा मुख्यमंत्री होणार या चर्चेने शिंदे नाराज आहेत का, अशी कुजबूज सुरु होती. अखेर या चर्चांवर शिंदे यांच्या पत्रकार परिषद घेवून त्यावर पडदा पडला. ''नापी है मुठ्ठी भर जमीन, अभी सारा आसमान बाकी है''; असे एक सुभाषित शिंदे यांनी ऐकवले. ''मी महायुतीतील घटक आहे. आम्हाला मोठे बहुमत मिळाले आहे. मी महायुतीच्या पक्षश्रेष्ठींना फोन करून कळवले आहे की, महायुती बळकट करण्यासाठी माझा तुमच्या निर्णयाला पाठिंबा असेल. आम्ही कायमच महायुतीसोबतच राहू. आमच्या सरकारमध्ये लाडकी बहीण योजना राबवल्याने मी संपूर्ण राज्यातील बहिणींचा लाडका भाऊ झालो. तेच पद माझ्यासाठी सर्वात मोठे आहे. माझ्यामुळे राज्यात महायुतीचे सरकार बनवण्यात कुठलाही अडथळा येणार नाही'', अशा शब्दात शिंदे यांनी आपल्या मनातील भावना मोकळ्या करून टाकल्या.

### शायरीतून सांगितला 'फ्युचर प्लॅन'

मुख्यमंत्रीपदावरील दावा सोडल्याचे सांगताच शिंदे यांचा पुढचा प्लॅन काय? असा सवाल पत्रकारांनी विचारला. त्यावर बोलताना ते भावूक झाले.एक शायरी ऐकवून त्यांनी फ्यूचर प्लॅन सांगितला.

''जीवन में असली उड़ान अभी बाकी है,<br>
अभी तो नापी है सिर्फ मुट्ठी भर जमीन,<br>
अभी तो सारा आसमान बाकी है

आपण खूप काम केले आहे. आम्ही केलेलं काम तुमच्या समोर आहे. यापुढे महायुती म्हणून काम करायचं आहे. आम्हाला मिळालेले बहुमत जितके मोठे आहे तितकेच आमची जबाबदारीही वाढली आहे. यापुढे महायुती आणखी काम करत राहणार आहोत,'' अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी आपला 'फ्युचर प्लॅन' सांगितला.

### कोणताही अडसर नाही...

''बाळासाहेब ठाकरे यांची सर्वसामान्य शिवसैनिक हा मुख्यमंत्री व्हावा ही इच्छा होती, ती इच्छा पंतप्रधान मोदी यांनी पूर्ण केली. त्याामुळे मुख्यमंत्री पदाचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह जो घेतील तो शिवसेना म्हणून आम्हाला मान्य असेल. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांना फोन केला होता. त्याांच्याशी संवाद साधला. मुख्यमंत्रीपदाबाबत जो काही निर्णय होईल, त्याामध्ये माझा कोणताही अडसर नसेल. भाजपाचे नेतृत्व जो निर्णय घेईल, तो आम्हाला मान्य असेल, असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

### एकनाथराव भाजपसाठी आवश्यक...

अजितदादांनी फडणवीसांना पाठिंबा जाहीर करुन शिवसेनेच्या दाव्यातील हवाच काढून टाकल्याची चर्चा होती. पण एकनाथ शिंदे यांना दूर लोटणे भाजपसाठी परवडणारे नाही.अडीच वर्षांपूर्वी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने सर्वात मोठा पक्ष असूनही कमी जागा असलेल्या शिंदेंना मुख्यमंत्री देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला.खरंतर संपूर्ण महाराष्ट्राला चकवा देणारा हा निर्णय होता. शिंदे यांच्याकडे महायुतीतील सर्वात मोठा मराठा चेहरा म्हणून पाहिले जाते.मराठा आरक्षणाचा मुद्दा अजून निकाली निघालेला नाही.मनोज जरांगेंनी सत्तास्थापनेनंतर पुन्हा एकदा आरक्षणाचा लढा तीव्र करतानाच मराठा समाजाला सामूहिक उपोषणाची हाक दिली आहे. त्यामुळे महायुतीपुढे या आंदोलनाला रोखणे हे नवे आव्हान असणार आहे.जर शिंदेंना डावलले गेले तर मराठा समाजाची नाराजी ओढावू शकते.जर हे होऊ द्यायचे नसेल तर शिंदेंना साथ तितकीच महत्वाची असणार आहे.मुंबई पालिकेतही भाजपला शिंदे आवश्यक ठरतील. महायुतीत जर एकनाथ शिंदे नाराज राहिले तर लोकांमध्ये नकारात्मक संदेश जाऊ शकतो. महायुतीपासून शिंदे वेगळे झाल्यास भाजपने सत्तेसाठी शिंदे यांचा वापर करून घेतला असा प्रचार होऊ शकतो. ज्याचा फटका भाजपला आगामी काळात बसू शकतो.महाराष्ट्रात भाजपाला कडवं आव्हान हे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे असणार आहे.त्यात ठाकरेंना नामोहरम करण्यासाठी शिंदेंची साथ भाजपसाठी महत्वाची असणार आहे.



## मोटारीच्या धडकेने दुचाकी चालक ठार

**पांगरी** : वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील संतोष मच्छिंद्र आगलावे (वय ४० रा.येरमाळा, ता.कळंब जि. धाराशिव) हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात सोमवारी सकाळच्या सुमारास घडला. या संदर्भात मताचे बंधू संजय आगलावे यांनी पांगरी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एमएच०४- एफआर-३०७१ या अपघातानंतर फरार झालेल्या मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहायक फौजदार कोठावळे करीत आहेत.

## चारित्र्याचा संशयावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर/प्रतिनिधी**

करून तुझ्या पोटात वाढलेले मुल कोणाचे आहे असे म्हणत चारित्र्याचा संशय घेत विवाहितेचा मानसिक व शारीरिक त्रास देऊन जाचहाट केल्याप्रकरणी सासरकडच्या मंडळींवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहिणी मल्लिकार्जुन मगरूमखाने (वय-२१, रा.निराळे वस्ती, महादेव गल्ली, मुरारजी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. पती मल्लिकार्जुन, सासरे चंद्रकांत मगरूमखाने, सासू संगीता मगरूमखाने, दिर सागर (सर्व. रा.निराळे वस्ती, महादेव गल्ली, मुरारजी पेठ) व नणंद तेजस्विनी (रा.विजापूर, राज्य- कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

## बुलेटच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू



**सोलापूर** : भरधाव वेगाने बुलेट वाहन चालून वृद्धाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी चौक ते जुना पुना नाका दरम्यान घडली. याप्रकरणी अनिल अशोक पाटील (वय-३१, रा.गोल्टन गेट, अवंती नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संदेश पंडित जोगे (रा.संतोष नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पो. नि. पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

## विविध ठिकाणी विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : शहर आणि परिसरात विविध कारणावरून दोन महिलांनी अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केले. त्यापैकी पहिली घटना नवीन विडी घरकुल कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे मंगळवारी रात्री घडली.

अंबिका अंबादास चाटला (वय ३६) असे विषारी रंग प्राशन केलेल्या महिलेचे नाव आहे.तिला रवी चाटला (मुलगा) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे. दुसरी घटना शहरातील भगवान नगर झोपडपट्टी येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. देवमा सुरेश घोडके (वय ४०) असे विषारी रंग प्राशन केलेल्या महिलेचे नाव आहे. तिला श्रीराम मंजुळे (नातेवाईक) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

## पुण्यातील मुळशीत खळबळ, दीड मिनिटात १० लाख लंपास

**पुणे** : मुळशी तालुक्यातील पिरंगुट येथे पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या एटीएममधून अवघ्या १ मिनिट २८ सेकंदात १० लाख ८९ हजार ७०० रुपयांची चोरी झाली. दोन चोरट्यांनी चावीच्या साहाय्याने एटीएम उघडून रोख रक्कम लंपास केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून पौड पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पठ्ठ्याने ना हातोडा ना इतर कोणत्याही हत्याराचा वापर करत त्याने एटीममधील कॅश लंपास केली. दोघांनी काही वेळात लाखो रूपयांवर डल्ला मारला. याबाबत पौड पोलिसात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'रडीचा डाव' खेळायचा नाही!

| कल्याण |
|---|
| 260-82-200 |

| मुंबई |
|---|
| 139-34-239 |

# सावधान! तरुणाईच्या नौकरीच्या स्वप्नांचा गैरफायदा

## विमानतळाच्या खोट्या भरती आडून लाखोंचा गंडा

**सोलापूर/खास प्रतिनिधी**




पुढील डिसेंबर २०२४ मध्ये विमानसेवा सुरु होणाऱ्या सोलापूरच्या होटगी रस्त्यावरील विमानतळ प्रशासनात तिकीट एजंट, सुरक्षा गार्ड, हाऊस किपर आदी पदांसाठी भरती करण्यात येत असून तरुणांना सरकारी नोकरीची संधी असल्याचे आमिष दाखवत नोएडा आणि दिल्ली परिसरातील हरिओम् कल्सल्टन्सी व ओम सेव्हन या कंपनीकडून तरुणांना गंडा घातला जात असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी मध्यल्यामध्येच या कंपन्यांच्या नावाखाली फोन करुन काही जणांनी लाखोंचा चुना सोलापुरी युवकांना लावल्याची चर्चा सुरु झाली असून फसवणूक झालेले युवक आता तक्रारींची भाषा करु लागले आहेत.

विशेष म्हणजे इथल्या विमानतळ प्रशासनात अधिकृत भरती करण्यासंबंधी कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. तरीपण भरती होत असल्याचं खोटं भासवून नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांच्या स्वप्नांचा गैरफायदा घेऊन त्यांची फसवणूक होत असल्याची बाब स्पष्ट होत आहे. सरकारी नोकरीच्या आमिषानं तरुणांना गंडा घालताना खोट्या जाहिराती दाखविल्या जात आहेत.सुरवातीला जाहिराती दाखवायच्या आणि त्यानंतर कॉल्स् करुन तरुणांना फसवेगिरीच्या जाळ्यात अडकवायचे असा प्रकार बिनदिक्कतपणे मागच्या काही दिवसांपासून सुरु आहे. सरकारी नोकरीच्या आशेपाटी तरुण फसत आहेत. नोएडा आणि दिल्ली परिसरातील ज्या कंपन्याकडून भरतीसंबंधी फसवूणक झाल्याचे प्रकार समोर येत आहेत, त्या कंपन्यांची अधिकृत वेबसाईटची लिंक मात्र सध्या मिळत नाही, अशी माहिती सोलापूर विकास मंचकडून मिळाली आहे.

### 'असा' घातला जातोय गंडा

फसवे लोक स्वत:ला विमानतळ अथवा नागरी उड्डाण मंत्रालयाशी संबंधित अधिकारी असल्याचे भासवत आहेत. ते सोलापूर विमानतळासाठी विविध पदांसाठी अर्ज मागवून नोकरी देण्याचे खोटे आश्वासन देतात. यासाठी ५ ते ५० हजार रुपयांपर्यंत प्रोसेसिंग फीस, ट्रेनिंग फीस, किंवा सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून रक्कम मागितली जाते. या फसवणुकीत तरुणांचा पैसा घेऊन ते गायब होतात, आणि नंतर त्यांच्याशी संपर्क करणे अशक्य होते.

### जाधव म्हणाले, 'असे' अनुभवले कॉल्स्

या संदर्भात सोलापूर विकास मंचाचे सदस्य विजय कुंदन जाधव म्हणाले, माझ्याकडे अनेक वेळा लोकांच्या कॉल्स येतात, जिथे ते सोलापूर विमानतळावर नोकरीसाठी अर्ज कसा करायचा, अशी विचारणा करतात. मला स्वतःला काही फसवे कॉल आले आहेत, ज्यात मला खोट्या जाहिरातींचा अनुभव आला. सोलापूरच्या तरुणांनी सतर्क राहून अशा प्रकारांना बळी पडू नये, सतर्क राहून फसवणूक टाळावी, असे जाधव म्हणाले.

### अफवांवर विश्वास नकोच

सोलापूर विमानतळावरील नोकऱ्यांविषयी कोणतीही अधिकृत जाहिरात झाल्यास ती केवळ सरकारी माध्यमांद्वारे प्रसारित होईल. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नका. आपण सतर्क राहून या फसवणूक प्रकरणांना आळा घालू शकतो. सोलापूर विमानतळ प्रकल्प हा सोलापूरच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे. तरुणांनी या प्रकल्पाची उपलब्धता आणि भरती प्रक्रिया केवळ अधिकृत माध्यमांतूनच तपासावी. फसवणुकीच्या अशा प्रकरणांना तोंड देण्यासाठी जागरूकता आणि सतर्कता गरजेची आहे.



- ▸▸ भरती प्रकरणी नोएडा अन् दिल्ली परिसरातील कंपन्या संशयाच्या भोवऱ्यात
- ▸▸ हरिओम् कल्सल्टन्सी व ओम सेव्हन कंपनीकडून तरुणांना भरतीसाठीचे फोन
- ▸▸ विमानतळ अथवा नागरी उड्डाण मंत्रालयाचे अधिकारी असल्याचे भासवत फसवणूक

### फसवूणक टाळण्यासाठी तरुणांनो 'अशी' घ्या काळजी...

- **अधिकृत स्रोत तपासा** –कोणतीही नोकरीची जाहिरात अधिकृत सरकारी वेबसाईट किंवा नागरी उड्डाण मंत्रालयाकडूनच पाहा.
- **कोणालाही पैसे देण्याची गरज नाही**– कोणत्याही प्रकारच्या नोकरीसाठी प्रोसेसिंग फीस किंवा सिक्युरिटी डिपॉझिट मागितल्यास ती फसवणूक असल्याचे समजावे.
- **तथ्य पडताळणी करा**– कोणतीही नोकरी संबंधित माहिती मिळाल्यास त्याची अधिकृतता तपासण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाशी किंवा नागरी उड्डाण मंत्रालयाशी संपर्क साधा.
- **अनधिकृत फोन कॉल्स टाळा**– अनोळखी नंबरवरून आलेल्या कॉल्सना उत्तर देताना सतर्क राहा. जर कोणी वैयक्तिक माहिती मागत असेल तर ती अजिबात देऊ नका.
- **फसवणुकीची पोलिसांत द्या तक्रार** –जर फसवणूक झाली असेल किंवा तशी शक्यता वाटत असेल तर पोलिसांत तक्रार नोंदवा.